# बाल हक्कासंदर्भात शिक्षकाची भूमिका

**डॉ. चरणदास युवराज कांबळे**
सहयोगी प्राध्यापक
शासकीय अध्यापक महाविद्यालय , रत्नागिरी

**प्रस्तावना:**

मानवी विकासाच्या वाटचालित मानवी हक्क ही संकल्पनेला स्वतःचे एक अनन्य साधारण असे महत्व आहे. मानवाच्या हक्काला व कर्तव्याला प्राचिन व जगाच्या संदर्भात सार्वत्रिक अशी मोठी परंपरा, इतिहास असला तरी ख—या अर्थाने विसाव्या शतकात मानवी विकासाच्या संदर्भात ख—या अर्थाने चर्चेचा विषय बनले. मानवी विकासाच्या वाटचालिचे व इतिहासाचे एक कटू वास्तव म्हणजे अनेक कारणांवरुन त्याने परस्पर केलेला संघर्ष होय ज्याचे स्वरुप स्वतःच्या लढाया, युद्ध व त्याचे शेवटचे टोक म्हणजे विसाव्या शतकातील दोन महायुदधे होत. या सर्व संघर्षात व विशेषतः महायुद्धात झालेल्या प्रचंड मानव हानीमुळे जगातील मानवतावादी तज्ञ, कायदेतज्ञ, राजकिय नेते समाजसुधारक, शिक्षणतज्ञ व एकुणच मानवाचा ख—या अर्थाने विकासाची स्वप्न पाहणारे सर्वचजण अंर्तमुख झाले व त्यांच्या चिंतनाचा, आत्मपरिक्षणाचा व चर्चेचा सार मूर्त रुपाने व ख—या अर्थाने मानवी हक्काच्या उदयाचा आधार बनले. पुढे ज्या मानवी हक्काने प्रत्येक व्यक्तिला त्याच्या विकासासाठी आवश्यक सामाजिक, राजकिय,आर्थीक वातावरण उपलब्ध करुन दिले.

मानवी हक्क या संकल्पनेत वस्तुतः प्रत्येक व्यक्तिच्या हक्काचा विचार अंर्तभूत आहे. लिंग, वय, भाषा, जात, धर्म, वंश, भौगोलिक क्षेत्रे यावर आधारित कोणताही भेद न करता जन्माला आलेल्या प्रत्येकाला हे हक्क जन्मतःच मिळतात. अर्थात आपणांस सदर हक्क मिळाले आहेत याची जाणीव मात्र जन्मतःच सर्वांना नसते व पुढेही लिंग, वय, भाषा, जात, धर्म, वंश, भौगोलिक क्षेत्रे यानुसार या जाणीवेमध्ये मोठा भेद असल्याचे निरिक्षणास येते. त्यातही सर्वात भिषन परिस्थिती ही बालकाची असल्याचे सार्वत्रिक स्वरुपात दिसून येते. याचे सर्वात महत्वचे कारण इतर सर्व घटक किंवा चलांपेक्षा ( लिंग, भाषा, जात, धर्म, वंश, भौगोलिक क्षेत्रे ) बालकाचे स्वतःच्या हक्काविषयी निर्सगतःच असलेले अज्ञान होय. जेथे हक्कांची जाणीवच नाही तेथे त्याचे संरक्षण व ( हक्कांच्या पायमल्ली संदर्भात ) दाद मागणे या बाबी बालकास स्वसंदर्भाने अशक्यप्राय होवून जातात. त्यामुळेच बालकास स्वहक्काविषयी प्रारंभी पालक व पुढे इतर नातेवाईक, शिक्षक, समाजातील जबाबदार घटक, स्वयंसेवी संस्था यांच्यावर अवलंबून रहावे लागते. बालकाचे स्वहक्काविषयीचे हेच परावलंबन त्याच्या संबधीत इतर घटकांना (हक्कांच्या पायमल्ली संदर्भात ) व त्यांच्या भूमिकांना अनन्यसाधारण महत्व प्राप्त करुन देतात. बालकाच्या जन्मानंतर त्याच्या हक्कासंदर्भात पालकाच्या भूमिकेस जेवढे महत्व आहे तेवढेच किंबहूना त्यापेक्षा जास्त महत्व शिक्षकाच्या भूमिकेस बालकाच्या शिक्षणास जेथून आरंभ होतो तेथून असल्याचे लक्षात येते. शिक्षकाच्या याच भूमिकांची चर्चा विस्ततृ स्वरुपात सदर पेपेरमध्ये केलेली आहे.

**बालक अर्थ व स्वरुप:**

तज्ञांच्या मते बालक म्हणजे शिशू, अज्ञाननवयी, पौगंड, होय. अनेक समाजात मूल किंवा बालक म्हणजे कुटुंबाची मालमत्त होय असे समजले जाते. बालपणाच्या कालखंडात त्या बालकाचे कुटंब असे मानते की त्याचे भरणपोषण करणे, त्याचे संगोपण करणे व त्याची काळजी घेणे, शिस्त लावणे, ही जबाबदारी आपल्यावर म्हणजे कुटंबावर आहे. नंतर मात्र बालकाला त्याच्या विविध भूमिकांचे आकलन होते. यात शाळेत जाणे, घरात मोठयांना मदत करणे इत्यादींचा समावेश होतो. कांहि समाजात पौगंडावस्थेतील मुलांना प्रौढ म्हणून वागविले जाते आणि इतर प्रौढाप्रमाणेच त्यांनीही काम करावे अशी अपेक्षा केली जाते. असे असले तरी बालके ही स्वावलंबी नाहीत याची जाणीव समाजाला आहे यांच्या पालनपोषणाची जबाबदारी कुटुंबाची मानली जाते.

बाल न्याय कायदा, 1986 अनुसार 16 वर्षाचा किंवा त्यापेक्षा कमी वयाचा मुलगा आणि 18 वर्षाची किंवा त्यापेक्षा कमी वयाची मुलगी बालक म्हणून समजली जाते. अगदी अलीकडेपर्यंत कोणत्याही कायद्यात बालक या संकल्पनेची कायदेशीर व्याख्या करण्यात आली नव्हती. सर्वसामान्यपणे बालक म्हणजे अशा सर्व व्यक्ती की ज्यांना संपूर्ण कायदेशीर क्षमता प्राप्त झालेली नाही.

**बालकांच्या हक्काविषयी करार**

राष्ट्रसंघाव्दारे प्रथमतः 1924 साली बालकांच्या हक्कासंबधी जाहीरनामा घोषीत केला गेला. राष्ट्रांच्या संयुक्त संघाची म्हणजे म्हणजे राष्ट्रसंघाची स्थापना 1919 साली झाली व त्याच्या विसर्जनानंतर स्थापन झाालेल्या संयुक्त राष्ट्रसंघाने 1959 साली बालकांच्या हक्कांचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. मानवी हक्कांच्या संदर्भात उचलेले हे महत्वाचे पाउल समजले जाते. या जाहीरनाम्यात खालील मुद्यांचा समावेश आहे.


1. या जाहीरनाम्यात नमूद केले गेलेले सर्व हक्क सर्व मुलांना वा बालकांना लागू आहेत. सर्व मूले वा बालके वंश, वर्ण, लिंग, भाषा, धर्म, राजकीयता किंवा अन्य मतप्रणाली, राष्ट्रीयता, संपत्ती, जन्म किंवा अन्य दर्जा याबाबतच्या भेदभावाशिवाय जाहीनाम्यातील हक्क प्राप्त होण्याय पात्र आहेत.
2. बालकाला विशेष संरक्षण मिळणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे त्याच्या शारीरिक, मानसिक, नैतिक, अध्यत्मिक आणि सामाजिक विकास होण्याकरिता त्याला सर्वतोपरी संधी व सुविधा कायदेशीर तसेच इतर मार्गाने मिळाल्या पाहिजेत.
3. प्रत्येक बालक हे त्याच्या जन्मापासून नावं व राष्ट्रीयत्व मिळवण्यास पात्र समजले गेले पाहिजे.
4. प्रत्येक बालकाला सामाजिक सुरक्षेचे लाभ मिळाले पाहिजेत.
5. शारीरिक, मानसिक, सामाजिकदृष्टया विकलांग बालकाला खास वागणूक व शिक्षण दिले गेले पाहिजे व त्याची विशेश काळजी घेजली पाहिजे.
6. बालकाच्या व्यक्तिमत्वाच्या विकासाकरिता त्याला प्रेम मिळणे व समजावून घेणे गरजेचे असते. यासाठी त्याचे पालक व समाज या दोन्हीनी ही जबाबदारी स्विकारली पाहिजे.
7. बालकाला सक्तिचे व मोफत शिक्षण मिळाले पाहिजे.
8. कोणत्याही परस्थितीत संरक्षण व सहाय यांचा सर्वात प्रथम लाळा बालकाला दिला पाहिजे.

VOL- XI ISSUE- XII DECEMBER 2024 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.02 ISSN 2349-638x

9. दुर्लभ, क्रुरपणा व शोषण यापासून बालकाचे रक्षण केले गेले पाहिजे.
10. सर्व पद्धतीच्या भेदभावापासून बालकाचे रक्षण केले गेले पाहिजे.

**बालहक्क:**

केवळ कायदेशीर तरतुदीमुळे बालकांचे हक्क सुरक्षित राहतील असे नाही कारण केवळ कायदा करुन बालकांची स्थिती सुधारता येणार नाही. यासाठी बालहक्क कोणते याची जाणीव असणे गरजेचे आहे. बालकांचे प्रमुख हक्क पुढीलप्रमाणे आहेत.




**बालकाचे हक्क**

आकुती क्रमांक 1 मध्ये नमूद केलेल्या हक्कांची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे–

**1.जगण्याचा हक्क**

प्रत्येक मुलीचा आणि मुलाचा हा मूलभूत हक्क आहे. यासाठी मुलीच्या किंवा मुलाच्या जन्मापूर्वीच मातेच्या आरोगयाची काळजी घेणे आवश्यक ठरते. वैद्यकिय सहाय आणि सुविधा प्राप्त करुन दिल्यास निरोगी मूल जन्माला येते. तिथपासूनच बालकांच्या हक्कांच्या जोपासनेची सुरवात आहे. आधुनिक वैज्ञानिक तंत्रज्ञानाच्या सहायाने गर्भाचे लिंग ओळखणे व मुलगी असल्यास तो गर्भ नष्ट करणे ही बाब अमानुश आहे. बालिकांच्या जगण्याच्या हक्कात त्यांना सन्मानाने व प्रतिष्ठेने वाढविणे अपेक्षित आहे.

**2. शिक्षणाचा हक्क**

शिक्षण व्यक्तीविकासासाठी आवश्यक असते. स्वतंत्र विचार करण्याची, तो विचार बोलून दाखवण्याची, नवे शोधण्याची व प्रश्न विचारण्याची ताकद शिक्षणामुळे येते. सर्वांगीण व्यक्तीमत्व विकास शिक्षणामुळे शक्य होतो. रोजगाराच्या संधी शिक्षणामुळे प्राप्त होतात. म्हणून मुलामुलींच्या शिक्षणाचा हक्क मान्य करण्यात आला आहे.

**3. राष्ट्रीयत्व असण्याचा हक्क**

बालकांना भविष्यात एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून वावरायचे असते. त्यांची व्यक्तीगत अस्मिता जोपासली जावी म्हणून प्रत्येक बालकाला नांव असण्याचा हक्क आहे. याचबरोबर प्रत्ये बालक हे कोणत्यातरी देशाचे नागरिक होणार असते. नागरिक म्हणून त्यांना काहीतरी हक्क प्राप्त होत असतात. यासाठी राष्ट्रीयत्व मिळवण्याचा हक महत्वाचा ठरतो.

**4. शोषण व अत्याचार इ. पासून संरक्षणाचा हक्क**

बालकांच्या हक्कातील हा महत्वाचा हक्क आहे. बालकांना कौटुंबिक हिंसेचे बळी केले जाते. त्यांना बेसुमार मारझोड करणे, डांबून ठेवणे, पळवून नेणे त्यांचा छळ व हत्या करणे इ. गैरव्यवहार केले जातात. यापासून संरक्षण हा बालकांचा हक्क आहे.

**5. स्वावलंबी व मानाने जगण्याचा हक्क**

शारीरिक व मानसिकदृष्टया अपंग असणा–या मुलामुलींना विशेष संरक्षणाची आणि मदतीची आवश्यकता असते. त्यांना सन्मानाने, प्रेमाने वागवले पाहिजे. आपल्या वयाच्या मुलामुलींबरोबर मिरवण्याचा, त्यांच्या बरोबरीने विकासाच्या संधी प्राप्त करण्याचा त्यांना अधिकार आहे.

**6. समान वागणूक मिळवण्याचा हक्क**

बालकामध्ये जात, धर्म आणि लिंग यावर आधारीत भेद करणे अमानवी आहे. म्हणूनच मुलगा व मुलगी यांना विषम वागणूक देणे, मुलांना प्राधान्य देवून मुलींना गौण लेखणे अंत्यंत निंदनीय आहे. कुटुंबातून मिळणारे संरक्षण, प्रेम, काळजी जिव्हाळा यांवर मुलामुलींचा समान हक्क आहे. नव्या समाजरचनेसाठी प्रथम कुटुंबातील लिंगभेद व्यवहार नष्ट झाला पाहिजे.

**कठिण परस्थितीत बालकांच्या हक्कांचे संरक्षण**

अनेक बालकांना त्यांच्या जीवनकाळात विविध स्वरुपाच्या कठिण परिस्थितींचा सामना करावा लागतो. संयुक्त राष्ट्रसंघाने 1959 सालच्या बाल हक्क जाहीरनाम्याच्या कलमामध्ये बालकांना सामोरे जावे लागणा–या कठिण परिस्थितीचे वर्णन करण्यात आले आहे. सदरची कलमे व वर्णन पुढील सारणीप्रमाणे

| अ. नं | कलम कमांक | कठिण परिस्थितीचे वर्णन |
|---|---|---|
| 1 | 9 | विवाहविच्छेद घेतलेल्या मातापित्यांची मुले |
| 2 | 11 | मुलांचा अनैतिक व्यापार व त्यातून बाहेर पडण्याची असमर्थता असलेली मुले |
| 3 | 19 | शिवीगाळीचा सामना करावी लागणारी मुले |
| 4 | 22 | निर्वासित मुले |
| 5 | 23 | अपंग मुले |
| 6 | 30 | अल्पसंख्यांक व लोकसंख्येतील गरीब मुले |
| 7 | 35 | विक्री, व्यापर व अपहरण केलेली मुले |
| 8 | 37 | स्वातंत्रापासून वंचित असलेली मुले |
| 9 | 38 | युद्धसदृश्य परिस्थितीशी झगडणारी मुले |

मुलांच्या व बालकांच्या हक्कांचा विचार करता पालकांतर्फे घेतली जाणारी काळजी आणि त्यांचे मार्गदर्शन मुलाच्या जीवनात अत्यंत महत्वाचे आहे. या सर्व परिस्थितीत आपल्या पालकांबरोबर संबध ठेवण्याचा व ते जतन करण्याचा हक्क बालकाला आहे. ज्या मुलांना कुटुंबापासून वंचित कले आहे त्यांच्या संरक्षणाची व संगोपणाची जबाबदारी शासनाची आहे. खाली नमुद केलेल्या मुलांना शासनाने विशेष स्वरुपाची वागणूक दिली पाहिजे.

- बालकामगांर
- बालसैनिक
- बेघर मुले
- गैरव्यवहारात गुंतवण्यात आलेली मुले

**बालकामगांर**

एका विशिष्ट वयापर्यत बालकांना रोजगांर मिळवण्यासाठी जुंपले जावू नये हे सर्वमान्य आहे, परंतू प्रत्यक्षात असे दिसते की 8 ते 14 वर्षाची मुले कामाला जुपली जातात. ज्या वयात बालआनंद, शिक्षण घ्यायचे त्या वयात कमी मोबदल्यात काम करुन घेतले जाते. वेठबिगार म्हणून बालकांचे शोषण केले जाते. एखादया वस्तु प्रमाणे बालकांची खरेदी विक्री करुन त्यांना अनैसर्गिक वातावरणात कामाला लावून बालकांचे हक्क हिरावून घेतले जातात.

**बालसैनिक**

अनेक देशामध्ये बालकांची सैनिक म्हणून भरती केली जाते. पालकांच्या परवाणगीने किंवा त्याशिवाय त्यांना सैनिकी प्रशिक्षण दिले जाते. मुले आज्ञाधारक बनवणे, स्वतःच्या जीवीताचा त्याग करण्यास तयार करणे, आत्मघातक पथक, हिंसा, दहशतवादाचे प्रशिक्षण इ. वातावरणमुहे मुले नैसर्गिक वातावरणाला मुकतात.

**बेघर मुले**

अनेक बालकांना आपले बालपण घराच्या उबदार वातावरणात न घालवता रस्त्यावर अनुभवावे लागते. अत्यंत असुरक्षित वातावरणात वाढणारी ही मुले कोवळया वयात अर्थार्जन करु लागतात. शहरात चौकात भीक मागण्यापसून ते कचरा गोळा करण्यापर्यत अनेक स्वरुपात त्यांना कामात गुंतवण्यात येते.

**गैरव्यवहारात गुंतवण्यात आलेली मुले**

बालकामगांर हा बालकांचा शोशणाचा सर्वांना माहित असणारा प्रकार आहे, परंतू बालकांचे लैगिंक शोषण केले जातात. याबाबत मात्र स्पष्टपणे बोलले जात नाही. वस्तुस्थिती अशी की, बालकांचे मोठया प्रमाणावर याबाबत शोषण केले जाते. अल्पवयीन मुलामुलींवर बलात्कार, बालिकांचा विनयभंग, व त्यांच्या लैगिक छळ आणि बालकांची वेश्या व्यवासायात गुंतवणूक असे प्रकार घडताना दिसतात. बालकांच्या हक्कांचा भंग करणारे हे व्यवहार अतंत्य घातक असून, कायद्याच्या आधारे ते नष्ट केले पाहिजेत.

थोडक्यात बालकांच्या शारीरीकि कोवळेपणाला आणि मानसिंक व भववनिक अपरिपक्वत्वेचा गैरफायदा घेतला जावू नये म्हणून त्यांना संरक्षणाची गरज आहे. बालकांची शोषणापासून बचाव होणे आवश्यक आहे. तरच उद्याची पिढी वैचारिक, भावनिकदृष्टया सक्षम,

सर्जनशील होईल. या कार्यात शिक्षकाची भूमिका महत्वाची ठरणार आहे.

**मानवी हक्क शिक्षणात शिक्षकाची भूमिका**

बालकांना आपण मानवी हक्कापासून वंचित ठेवत असू तर त्यांना आपण विकासापासून वंचित ठेवत आहोत. कारण मानवी हक्काशिवाय व्यक्तीचा विकास शक्य नसतो. प्रत्ये कुटुबांत असणा–या बालकांना विकासापासून दूर ठेवून प्रगत देशाचे स्वप्न कोणत्याही देशाला पाहता येणार नाही. देशाच्या प्रगतीसाठी, मताधिकार, बाल हक्क, दुर्बल घटकांना संरक्षण इ. तरतुदी, उपाययोजना एकीकडे अस्तित्वात आहेत. मात्र या तरतुदींचा, उपाययोजनांचा लाभ घेण्याची क्षमता मात्र निर्माण केली जात नाही. तेव्हा या क्षमतांचा विकास, मानवी हक्कांची जागृती करणे याबाबत शिक्षण व पर्यायाने शिक्षकाची भूमिका महत्वाची आहे असे वाटते.

बालकांचे हक्क त्यांना प्राप्त करुन देणे, त्यांच्या विकासामध्ये अडसर ठरणारे सामाजिक व्यवहार बदलणे व त्यासाठी आवश्यक मानवी हक्कांचे शिक्षण देणे, या सर्व बाबतीत शिक्षकाला कोणत्या भूमिका पार पाडाव्या लागतील व त्या भूमिकांना अनुसरुन कोणते कार्य शिक्षकडून अपेक्षित आहे या विचार पुढीलप्रमाणे करता येईल.

| अ. नं | शिक्षकाची भूमिका | भूमिकेला अनुसरुन शिक्षकाकडून अपेक्षित कार्य |
|---|---|---|
| 1 | विश्लेषक | 1. समाजामध्ये बाल हक्कासंदर्भात घडणा–या गोष्टीचे वि लेषण करणे<br>2. विविध वर्तमानपत्रे, नियतकालिकांमधील बाल हक्का संदर्भातील घटनांचे विश्लेषण करणे.<br>3. शाळेतील विद्यार्थ्यांच्या वर्तनांचे बाल हक्का संदर्भात विश्लेषण करणे |
| 2 | दिग्दर्शक | 1. बाल हक्कांच्या बदलत्या संदर्भाचे दिगदर्शन करणे.<br>2. बाल हक्काच्या संरक्षणासाठी आवश्यक वर्तनाचे दिगदर्शन करणे.<br>3. बाल हक्कसंदर्भात चळवळींना दिशा देणे |
| 3 | मूल्यमापक | 1. स्वतःचे वर्तन बाल हक्काच्यादृष्टीने होते की नाही याचे मूल्यमापन करणे.<br>2. समाजामध्ये घडणा–या घटनांचे मानवी हक्कांच्या संदर्भात मूल्यमापन करणे.<br>3. बाल हक्काच्या दृष्टीने विद्यार्थी वर्तनाचे मूल्यापन करणे. |
| 4 | प्रणेता / पुरस्कर्ता | 1. मानवी हक्कांच्या व बाल हक्कांचा सातत्यपूर्ण पुरस्कार करणे.<br>2. मानवी हक्काच्या व बाल हक्क उपक्रमांचे, कार्यक्रमांचे, चळवळीचे नेतृत्व करणे.<br>3. बाल हक्कासंदर्भात पोषण सामाजिक धारणांचा पुरस्कार करणे. |
| 5 | संशोधक | 1. मानवी हक्कासंदर्भातील विविध चलाविषयी संशोधने हाती घेणे.<br>2. स्वतः केलेल्या संशोधनाचे निष्कर्ष, लेखामधून, चर्चेमधेन लोकांसमोर मांडणे<br>3. मानवी हक्कासंदर्भात इतरांनी केलेल्या संशोधनाचे वाचन, चर्चा करणे. |
| 6 | संयोजक / आयोजक | 1. मानवी हक्काविषयीच्या जागृतीसाठी शाळेत व समाजामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करणे.<br>2. असे कार्यक्रम इतर संस्थाि किंवा व्यक्ती |

VOL- XI ISSUE- XII DECEMBER 2024 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 8.02 ISSN 2349-638x

| | | |
|---|---|---|
| | | आयोजीत करत असल्यास त्यांना प्रोत्साहन देणे. |
| 7 | **स्वयंपालनकर्ता** | 1. मानवी हक्कासंदर्भात आवश्यक माहिती, ज्ञान स्वतः आत्मसात करणे<br>2. बालकांच्या हक्कांना बाधा येणार नाही या संदर्भात स्वतः जागरुक रहाणे |

वरील सर्व भूमिकांचा व त्यासंदर्भातील कार्याचा व त्या कार्याच्या परिणामाचा विचार करता बालकांना त्यांच्या हक्कांची प्राप्ती व्हावी व त्यातून त्यांचे सबलीकरण व्हावे ही अपेक्षा पूर्ण होण्यास शिक्षण हे शिक्षकाच्या माध्यमातून महत्वपूर्ण भूमिका पार पाडू शकेल असे वाटते. अर्थात गरज आहे ती या भूमिकेतून शिक्षकाने कार्य करण्याची व त्या भूमिका पार पाडण्याची व त्या भूमिका पारा पाडण्यासाठी आवश्यक असणा–या क्षमतांचा विकास करणा–या शिक्षक–शिक्षण कार्यक्रमाची.

**संदर्भ ग्रंथ**


1. कुलकर्णी, पी. के., (2013). मानवी हक्क आणि सामाजिक न्याय. पुणेः डायमंड पब्लिकेशन.
2. पाटील, व्ही. बी., (2010). मानवी हक्क. पुणेः के सागर प्रकाशन.
3. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, व्यक्तीमत्व विकासः इयत्ता नववी अभ्यासपुस्तिका, पुणेः महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे.
4. मोरे, चंद्रकांत व भिलेगांवकर, सदानंद (2008). शिक्षक शिक्षण. पुणेः नित्यनूतन प्रकाशन.